गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक 2007/(322/07) विशी –4,महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 (1994 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 35) च्या कलम 3 च्या पोटकलम (2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर 2011 रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 (सन 2017 चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक 6) द्वारे संचालित राज्यविद्यापीठ)

(प्र-कुलगुरू कार्यालय)

डॉ. श्रीराम कावळे
एम. ए.(अर्थशास्त्र), पीएच. डी.,एम. कॉम.,डी. बी. एम.
जे. डी.सी. अँड ए.

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – **४४२६०५(म. रा.)**
दूरध्वनी क्र. ०७१३२-२२२२५७
E-Mail - provc.gug@gmail.com

दिनांक : 30/10/2026

प्रति,
मा. प्राचार्य,
संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय: 'गडचिरोली ज्ञानसभा – विकसित विदर्भाच्या दिशेने' या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेकरिता प्राध्यापकांच्या सहभागाची नावे सादर करण्याबाबत.

महोदय / महोदया,

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने **'गडचिरोली ज्ञानसभा – विकसित विदर्भाच्या दिशेने (Gadchiroli Gyansabha: For Vikasit Vidarbha)'** या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन **१८ नोव्हेंबर २०२६ रोजी, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे** करण्यात येत आहे.

या ज्ञानसभेच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020), भारतीय ज्ञान परंपरा, विज्ञान व तंत्रज्ञान, उद्योग क्षेत्र, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविद्या तसेच आंतरविद्याशाखीय संशोधन या विषयांवर विचारमंथन करण्यात येणार आहे. या परिषदेमध्ये विविध विषयांतील तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि प्राध्यापकांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची नावे विद्यापीठाकडे पाठविण्यात यावीत.

महत्त्वाच्या सूचना :

1. सदर ज्ञानसभेसाठी प्राध्यापकांचा सहभाग **निवडक स्वरूपाचा** (Selective Participation) राहणार आहे.
2. सर्व संबंधित प्राध्यापकांची नावे सादर करणे **अनिवार्य** आहे. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातून सहभागासाठी इच्छुक असलेल्या प्राध्यापकांची नावे दिलेल्या गूगल फॉर्म मध्ये २ नोव्हेंबर २०२६ पूर्वी द्यावी.
3. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठामार्फत प्राप्त नोंदींच्या आधारे सहभागी प्राध्यापकांची निवड करण्यात येईल.
4. **विद्यापीठाकडून निवड झाल्याबाबतचा अधिकृत ई-मेल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित प्राध्यापकांना ज्ञानसभेत सहभागी होण्यास पात्र मानण्यात येईल.** केवळ नाव सादर केल्याने सहभाग निश्चित होणार नाही.
5. त्यामुळे प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित विद्याशाखांच्या प्राध्यापकांना याबाबत अवगत करून निश्चित सहभाग नोंदविणाऱ्या प्राध्यापकांची नावे विद्यापीठाकडे **अनिवार्यपणे पाठवावीत.**

सदर ज्ञानसभा यशस्वी करण्यासाठी आपल्या महाविद्यालयाचे सहकार्य अपेक्षित आहे. तरी वरील सूचनांनुसार प्राध्यापकांची नावे विहित मुदतीत सादर करून सहकार्य करावे.

https://forms.gle/3ZijwNmQKkT2QuYf7

डॉ. श्रीराम कावळे
प्र-कुलगुरू